पुण्य नगरी
कोल्हापूर। बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये इंडक्शन प्रोग्राम उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील अभ्यासक्रम, सोयीसुविधा, विविध विभागांची माहिती होण्यासाठी इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रम, सांस्कृतिक, एनएसएस, एनसीसी, परीक्षा विभाग व उपलब्ध सोयीसुविधांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस. पी. थोरात होते.

यावेळी डॉ. सी. बी. पाटील यांनी नवीन शैक्षणिक धोरण व त्यातील विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांसाठीच्या तरतुदी, कौशल्य शिक्षणाचे महत्त्व याची माहिती दिली. डॉ. विशाल वाघमारे यांनी केंद्र, राज्य शासन व महाविद्यालयीन शिष्यवृत्तीबद्दल सांगितले.

प्रा. डॉ.जी.जे. नवाथे यांनी परीक्षा पद्धतीचे स्वरूप व मूल्यांकन याविषयी माहिती दिली. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. अरित महात यांनी कॉलेजमध्ये राबवल्या जाणाऱ्या सांस्कृतिक उपक्रमांची माहिती आणि त्यातून मिळणाऱ्या यशाविषयी सांगितले. एनएसएस विभागप्रमुख प्रा. संदीप पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व आणि राबवली जाणारे उपक्रम विषद केले.

कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आयोजनासाठी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर.बी.जोग यांचे सहकार्य लाभले.

प्रास्ताविक डॉ. संजय अंकुशराव यांनी केले. आभार डॉ. बी. टी. दांगट यांनी मानले. तर सूत्रसंचालन डॉ. स्नेहा देसाई आणि डॉ. शिल्पा खैरमोडे यांनी केले.